# University of Mumbai

पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पूनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ ४९० /२०१९

<u>परिपत्रक :-</u>

विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा /पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/१५०/२०१९ दि. २७ मे, २०१९ अन्वये प्रथम सत्र २०१९ मध्ये घेतलेल्या T.Y.B.Com (Sem-VI) (Choice Based) या परीक्षेचा निकाल दि. २५/०५/२०१९ रोजी जाहिर करण्यात आलेला असून; या परीक्षेस प्रविष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून पुढील सुचना/ परिपत्रक निर्गमित होईपर्यंत स्वीकारण्यात येऊ नयेत असे अवगत करण्यात आले होते. तरी, आता याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, या परीक्षेसाठी ज्या चार विषयांची परीक्षा विद्यापीठाने घेतलेली आहे या विषयांसाठी पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत.

**<u>Path for Online Application:-</u>**

<u>www.mu.ac.in</u> → Exams & Results → Examination → Application for Revaluation / Photocopy

Read the instructions carefully and proceed for filling the form.

तसेच उर्वरीत ज्या दोन विषयांची परीक्षा विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे या विषयांसाठी पुनर्मुल्यांकनासाठीचा अर्ज <u>सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपूर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.</u> तसेच या दोन विषयांच्या छायांकेत प्रती महाविद्यालयाने आपल्या पातळीवर मागणीप्रमाणे पुरवाव्यात.

विद्यापीठाकडे पूनर्मुल्यांनासाठी वरील प्रमाणेअर्ज पाठविताना अर्ज परिपूर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपूर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

उपरोक्त दोन्ही प्रकारचे अर्ज स्वीकारण्याचा कालावधी खालील प्रमाणे आहे:-

दि. ०६.०६.२०१९ ते १८.०६.२०१९

<u>अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.</u>

पुढे असे की या दोन्ही विषयांचे पुनर्मूल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुनर्मूल्यांकनात प्राप्त गुणांची यादी <u>सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी स्वरूपात दि. ०५/०७/२०१९ पर्यंत पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.</u>

उपरोक्त दोन्ही पद्धतीसाठीचा शुल्काचा तपशील:-

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ०४ जून, २०१९

# University of Mumbai

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्त्व व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई विद्यापीठ
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ०४ जून, २०१९